सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकार्यालय

(अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय)
वनभवन, रामगिरी रोड, पोलिस जिमखाना शेजारी, सिव्हिल लाईन्स, नागपूर -४४० ००१
दुसरा माळा, डीविंग, दूरध्वनी क्रमांक-०७१२-२५५६७८५,
Phone No : ०७१२-२५५६९१६ Email ID apccfnodal@mahaforest.gov.in

शिघ्रटपालाने/ई-मेलने

विषयः वनजमीन-चंद्रपूर
चक फुटाणा ते चक नवेगांव आणि नवेगांव मोरे, प्रजिमा-११० या रस्त्याच्या कामासाठी, चंद्रपूर जिल्हयातील २.३४२७ हे. वनजमीन वळती करणे बाबत.

क्रमांक कक्ष-१७/नोडल/चंद्रपूर/आयडी-१४२०९/3071 /२२-२३
नागपूर ४४० ००१ दिनांक 13 /०२/२०२३.

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा) चंद्रपूर

संदर्भः शासन पत्र क्र. एफएलडी-३६२३/प्र.क्र.२९/फ-१०, दि.१०.०२.२०२३.

संदर्भीय शासनाची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर पत्रान्वये विषयांकित प्रकरणी शासनाने १ ते ६ मुद्दे उपस्थित केले असून त्याअनुषंगाने आपणांस विनंती आहे की सदरची माहिती शासनास सादर करणे करिता या कार्यालयास सादर करावी.

सहपत्रःवरील प्रमाणे

(डॉ. कुमारास्वामी एस. आर.)
**उपवनसंरक्षक (वनसंवर्धन)**

क्रमांक कक्षा-3(1)/जमीन/प्र.क्र.57/22-23/8263
चंद्रपूर, दिनांक:- 18-2-23

प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस सादर. शासन पत्रातील 1 ते 6 मुद्यांची पुर्तता करून अहवाल या कार्यालयास सादर करावा ही विनंती.

मुख्य लेखापाल
मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालय
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर

# महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-३६२३/प्र.क्र.२९/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: - १० फेब्रुवारी, २०२३

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषय:- वनजमिन-चंद्रपूर
चक फुटाणा ते चक नवेगांव आणि नवेगाव मोरे, प्रजिमा-११० या रस्त्याच्या कामासाठी, चंद्रपूर जिल्ह्यातील २.३४२७ हे. वनजमीन वळती करण्याबाबत...

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/चंद्रपूर/ID-१४२०९/२४३५/२२-२३, दि.२०.१२.२०२२.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास सादर करावी:-

(१) केंद्रस्थ अधिकारी यांनी पर्यायी वनीकरणाकरीता मौजे गुंडवळ, ता.माहूर, जि.नांदेड येथील सर्व्हे नं ७० मधील १८.१८ हे. वनेत्तर जमीन प्रस्तावीत केली आहे. सदर जमिन अन्य एका प्रस्तावामध्ये *(राज्यमार्ग क्र. २६१, चुंचा-मनाठा-बारड-मुखेड रोड आणि मुदखेड-गडगा-खंडगाव-मुखेड-सावरगांव (बु.)-जांब, या रस्त्याचे कामासाठी नांदेड जिल्ह्यातील १८.१८ हे. वनजमीन वळतेकरणाचा प्रस्ताव)* पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केली आहे. याबाबत अधिक स्पष्टता होणे आवश्यक आहे.

(२) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करण्यात येणारी जमिन सुयोग्य असल्याबाबतचे उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र, ७/१२ उतारा, नकाशे, पर्यायी वनीकरणाची योजना इत्यादी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

(३) उपवनसंरक्षक यांनी स्थळ पाहणी अहवालामध्ये प्रस्तावित क्षेत्रामध्ये वाघ दिसून येत असल्याचे नमूद केले आहे. त्यानुषंगाने प्रस्तावित वनजमिन ही व्याघ्र भ्रमण मार्गाचा भाग आहे किंवा कसे, तसेच वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या कलम ३८ O(i)(g) नुसार

वन्यजीव मंजुरीची आवश्यक आहे किंवा कसे, याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे अभिप्राय घेऊन, माहिती सादर करावी.

(४) प्रस्तावित क्षेत्र मौजे लोनी रिठ, कंपा क्र. ५५२B, मौजे नवेगाव मोरे, कंपा ५४७A व चक फुटाणा, कंपा क्र. ५५१E या क्षेत्राचे अधिकार अभिलेख (७/१२ उतारे) सादर करावेत.

(५) वळतीकरणासाठी प्रस्तावित क्षेत्राच्या गावाचे नाव, सर्व्हे नं./ गट नं.,कंपा क्र. गावनिहाय / कंपार्टनिहाय क्षेत्र इत्यादी माहितीसह, सुधारित KML File सादर करावी.

(६) मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर यांनी वनभंग झालेल्या क्षेत्राच्या दुप्पट अवनत क्षेत्रावर पर्यायी वनीकरण करण्यासाठी शिफारस केल्याप्रमाणे आवश्यक रक्कम भरण्यास प्रकल्प यंत्रणेने तयार आहे किंवा कसे, त्याबाबत माहिती सादर करावी.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर